**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१८ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २३/०१/२०१२

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई शहर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर क्षेत्रिय अधिकाऱ्याचे (झोनल ऑफिसर) काम सोपविण्याबाबत.

महोदय / महोदया,

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे. या निवडणुकांसाठी लागणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका यांना प्रदान करण्यात आले आहेत. या अधिकारांचा वापर करुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी आवश्यकतेनुसार शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षेत्रिय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते. ही जबाबदारी सोपवितांना शासकीय अधिकाऱ्यांचा दर्जा विचारात घेतला जात नाही अशा आशयाच्या तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत. विशेषत: काही कार्यकारी अभियंता या जिल्हास्तरीय पदधारकावर झोनल ऑफिसरची जबाबदारी सोपविण्यात आली आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. या संदर्भात नमूद करण्यात येते की, निवडणुकीची जबाबदारी सोपवितांना शक्य असेल तिथवर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा दर्जा विचारात घेतला जाणे आवश्यक असते.

निवडणुकीमध्ये क्षेत्रिय अधिकाऱ्यांवर असलेली कामाची जबाबदारी लक्षात घेता त्यांना सातत्याने सहायक निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या थेट नियंत्रणाखाली काम करावे लागते त्यामुळे या पदावर नियुक्त करण्यात येणारा अधिकारी हा सहायक निवडणूक

निर्णय अधिकाऱ्याच्या पदाच्या समकक्ष दर्जाचा किंवा त्याच्यापेक्ष कनिष्ठ दर्जाचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांना झोनल ऑफिसरचे काम देण्यात आले असल्यास त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात याव्यात व त्यांच्याऐवजी अन्य योग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ही जबाबदारी सोपविण्यात यावी तसेच यापुढेही झोनल ऑफिसरची जबाबदारी सोपवितांना उपरोक्त निकष विचारात घेण्यात यावेत असे आपणास मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

आपला,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र